भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

अनुक्रमांक 96563 दिनांक 30/10/06
रुपये 200
नांव टागोर शिक्षण संस्था
पत्ता भोसरी पुणे २६
सही प्रमोद पानसरे

श्री. सोळंकर प्रमोद पी.,
मुद्रांक विक्रेता, गवळीनगर, भोसरी, पुणे-३९
ला.नं.हवेली ७/३८/१९९५

W 446740

NOTARY
BALASAHEB T. THOPATE
PUNE DIST. MAHARASHTRA
R. NO. 3269
GOVT. OF INDIA

18 OCT 2006
उप कोषागार अधिकारी
कोषागार, पुणे करिता

॥ श्री गजानन प्रसन्न ॥

**-: भाडेपट्टा करारनामा :-**

भाडेपट्टा आज वार = सोमवार, दिनांक = ०६/११/२००६ इसवी ते दिवशी....

**श्री. नंदकुमार विठोबा लांडे** )
**वय : ४३, वर्षे, धंदा= व्यवसाय** ) .... **लिहून देणार**
**रा. लांडेवाडी, भोसरी, पुणे-३९.** )

**यांसी...**

**श्री. टागोर शिक्षण संस्था तर्फे (अध्यक्ष)** )
**श्री. सुरेश नारायण फलके**
**वय : ४६, वर्षे, धंदा= नोकरी** ) .... **लिहून घेणार**
**रा. इंद्रायणीनगर, गुळवे वस्ती, भोसरी, पुणे २६.** )

N.V.

कारणे भाडेपट्टा करारनामा इमारत व जागेचा २५ वर्षे मुदतीचा लिहून देतो की,

१) **मिळकतीचे वर्णन :** तुकडी, तालुका हवेली, मे.सब रजिस्ट्रार हवेली यांचे हद्दीतील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचे हद्दीतील गांव मौजे **भोसरी** येथील मिळकत यांसी **सर्व्हे नं. २४ मधील** ८० गुंठे जागा, व इमारत यांसी क्षेत्र २०×१९ दहा रूम, पडवी १०×१९० चौ. फुट, २५×२५ चौ. फुट तीन रूम, १०×७५ चौ. फुट पडवी, पाण्याची टाकी ८×१० चौ. फुट, चार संडास, मुतारी संख्या २०, एक बाथरूम, ६६ गुंठे क्रिडांगण, इमारतीच्या मागील ५ गुंठे बागेसाठी चौ. फुट इमारतीचे वर्णन पक्के इमारत वीट बांधकाम, (स्थावर सिमेंट पत्रा)मिळकत.

यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणेः-

| | | |
|---|---|---|
| पुर्व | : | क्रिडांगण |
| दक्षिण | : | मोकळी जागा |
| पश्चिम | : | मोकळी जागा |
| उत्तर | : | मोकळी जागा |

२. वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत लिहून देणार यांचे मालकी हक्काची व वहीवाटीची असून सरकारी कागदोपत्री सर्व ठिकाणी लिहून देणार यांचेच नावाची नोंद आहे. त्यांचेशिवाय सदर मिळकतीवर अन्य दुसरे कोणी वालीवारस यांचा काही एक हक्क हितसंबंध, ताबा, वहीवाट, मालकी वैगरे नाही. सदर मिळकत लिहून देणार यांना दरमहा भाड्याने देण्याची होती. त्यानुसार तशी लिहून देणार यांच्याकडे लिहून घेणार यांनी विचारणा केली असता, खालील अटी व शर्तीवर **शैक्षणिक संस्थेच्या शाळेसाठी** जागा दरमहा भाडयाने देत आहोत, आपणांमध्ये ठरलेल्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे-

अ) वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत भाडेपट्टा कराराने **दि.** ०६/११/२००६ रोजी पासून लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना दिलेली आहे. सदर भाडेपट्ट्याची मुदत **दि. ०६/११/२००६ रोजी** पासून ते **दि.** ०५/११/२०३१ रोजी पर्यंत म्हणजेच २५ वर्षासाठी राहील. पुढील करारनामा आपल्या दोघांच्या सोयीनुसार केला जाईल.

बी. वर कलम १ यांत वर्णन केलेल्या मिळकतीचा लिहून घेणार वापर करीत असतांना त्या वापराबद्दल लिहून देणार व लिहून घेणार यांचे दरम्यान

N.V. [signature] [signature]

ठरलेप्रमाणे दरमहा भाडे म्हणून रक्कम रू. १०,०००/- (अक्षरी रक्कम रूपये दहा हजार) इतकी ठरली आहे.

सी. सदर करारनाम्याची मुदत संपल्यावर लिहून घेणार यांना नोटीस पाठविण्याची आवश्यकता नाही. सदर जागेचा ताबा लिहून देणार यांना परत करणेचा आहे.

डी. सदर जागेत लाईट असून लाईट बिलाचा वापर फक्त **शैक्षणिककामासाठीच** करणेचा आहे. त्याचा गैरउपयोग लिहून घेणार यांनी करावयाचा नाही. तसेच सदर जागेतील येणारे लाईट बील व पाणी बील **लिहून देणार** यांनी भरावयाचे आहे.

ई. लिहून घेणार यांनी सदर जागेत शेजारील लोकांना त्रास होईल अशी वर्तनुक करणेची नाही. सदर जागेत लिहून देणार यांच्या परवानगी शिवाय लिहून घेणार यांनी कोणताही कायमस्वरूपी बदल करावयाचा नाही. किंवा त्यापासून जागेचे काही नुकसान झालेस ते सिक्युरीटी डिपॉजिट म्हणून लिहून देणार यांना वजा करणेचा हक्क राहील.

N.V. [signature] [signature]

येणेप्रमाणे भाडेपट्टा करारनामा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना आजरोजी राजीखुशीने व अक्कलहुशारीने वाचुन समजुन उमजुन कोणत्याही दबावाला बळी न पडता कोणत्याही प्रकारचा नशापाणी न करता लिहून दिला असुन त्याप्रित्यर्थ लिहून घेणार यांनी लिहून देणार यांनी खालील दोन साक्षीदारांसमक्ष आजरोजी सह्या केल्या आहेत.

भोसरी, पुणे.
दि. ०६/११/२००६.

साक्षीदार-

१) सही = ----------
नाव = श्री. आगे एच. एस.
पत्ता = सर्वे नं. ३२४, सद्गुरुनगर, भोसरी, पुणे-३९.

२) सही = ----------
नाव = श्री. तांडे शशीकांत एस.
पत्ता = साई पार्क, दिघी, भोसरी पुणे.

N.V.
----------
श्री. नंदकुमार विठोबा लांडे
लिहून देणार

----------
श्री. टागोर शिक्षण संस्था तर्फे (अध्यक्ष)
श्री. सुरेश नारायण फलके
लिहून घेणार

NOTARY BALASAHEB T. THOPATE PUNE DIST. MAHARASHTRA R. NO. 3219 GOVT. OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

Noted & Registered
at Serial Number
Date : A-1123/2006

6 NOV 2006

BEFORE ME

BALASAHEB T THOPATE
NOTARY, GOVT OF INDIA
BHOSARI PUNE-39

6 NOV 2006